Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# जालना जिल्ह्यातील महिला बचत गट व कृषी आधारित उद्योग: एक भौगोलिक अध्ययन

**डॉ. केंदळे व्ही. एन.**
भूगोल विभाग,
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय,
जालना.

**प्रस्तावना:**

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य सरकारने महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना सुरु करण्यात आल्या. या सर्व योजनांचा उद्देश महिला सबलीकरणावर भर देऊन पुरुष व स्त्रीया यांच्यात सर्व बाबतीत समानता प्रस्थापित करणे हा होता. ग्रामीण भागात दारिद्र्य, वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरा, रुढी, चालीरीती यामुळे महिलांची स्थिती खालावलेली दिसून येते. अज्ञान, अशिक्षितपणा, असंघटीतपणा, रोजगाराचा अभाव यामुळे दारिद्र्यात वाढ होते. यामुळे महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासासाठी बचतगट महत्वाची भूमिका निभाऊ शकते. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात अनेक छोटे मोठे बचत गट आज कार्यरत आहेत. ज्याच्याद्वारे आज तळागाळातील भारतीय स्त्री आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करतेय. ग्रामीण आणि महिला उद्योजकता विकसित करण्यात बचत गटांचा मोठा हात आहे. स्वावलंबी, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वत:च्या पायावर उभी राहिलेली स्त्री ही खऱ्या अर्थाने देशाच्या आर्थिक विकासातील योगदानाची साक्ष आपल्याला बचत गटांच्या माध्यमातून देताना दिसते. ग्रामीण भागात अनेक महिलांचे संसार बचत गटांच्या माध्यमातून सुरू झालेल्या व्यवसायांतून उभे राहिले आहेत. लोणचे-पापड, सॅनिटरी नॅपकीन, ज्वेलरी मेकिंग, गारमेंट, शेती, दुग्ध व्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यपालन अशा विविध प्रकारच्या व्यवसायांची सुरुवात अनेक बचत गटांनी केली आहे. बचत करणे, कर्ज घेणे, त्यातून उद्योग उभारून कमाई करून कर्जाची परतफेड करणे या बाबी महिलांना समजू लागल्या आहेत.

**जालना जिल्ह्यातील महिला बचत गटांची संख्या :**

जालना जिल्ह्यामध्ये महिला बचत गट हे २००० नंतर सक्रिय झालेले दिसून येतात. महिलांना बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. याच माध्यमातून महिला बचत गटामार्फत आर्थिकदृष्ट्या

स्वयंनिर्भर व्हायला मदत झाली आहे. जालना जिल्ह्यातील महिला बचत गटांची व त्याव्दारे चालणाऱ्या कृषी आधारित उद्योगांची संख्या खालील तक्त्यात देण्यात येत आहे.

तक्ता क्र. १

**जालना जिल्ह्यातील महिला बचत गट व कृषी आधारित उद्योगांची संख्या**

| वर्षे | महिला बचत गटांची संख्या | कृषी आधारित उद्योग करणाऱ्या बचत गटांची संख्या | उद्योग करणाऱ्या गटांचे प्रमाण (%) | वार्षिक बदल % |
|---|---|---|---|---|
| २००१ | २८५ | ५ | १.७५ | - |
| २००२ | ५११ | ७ | १.३७ | ४०.०० |
| २००३ | ६९० | ९ | १.३० | २८.५७ |
| २००४ | ८०३ | १४ | १.७४ | ५५.५६ |
| २००५ | ९५६ | २२ | २.३० | ५७.१४ |
| २००६ | ११५२ | ३६ | ३.१३ | ६३.६४ |
| २००७ | १५१५ | ६३ | ४.१६ | ७५.०० |
| २००८ | २१०४ | ९६ | ४.५६ | ५२.३८ |
| २००९ | २६६४ | १४७ | ५.५२ | ५३.१३ |
| २०१० | ३१३४ | २२१ | ७.०५ | ५०.३४ |
| २०११ | ३५५९ | २९७ | ८.३५ | ३४.३९ |
| | Correlation | ०.९९ | | |

स्त्रोत: जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, सन २००१ मध्ये महिला बचत गटांची एकुण संख्या ही २८५ इतकी होती त्यापैकी फक्त ५ महिला बचत गट हे कृषी आधारित उद्योग करत होते ज्यांचे प्रमाण एकुणाशी १.७५% इतके होते. सन २०११ मध्ये महिला बचत गटांची संख्या ३५५९ अशी आहे ज्यापैकी २९७ महिला बचत गट हे कृषी आधारित उद्योग करतात. म्हणजेच एकुण महिला बचतगटापैकी ८.३५% बचतगट हे कृषी आधारित उद्योग करतात. २००१ च्या तुलनेत महिला बचत गटांनी उद्योग करणाचे प्रमाण हे ६.६०% वाढलेले आहे. महिला बचत गटांची संख्या आणि त्यापैकी कृषी आधारित

उद्योग करणाऱ्या बचतगटांची संख्या यातील सहसंबंध (०.९९) असे दर्शविते की तो उच्च स्वरुपाचा आहे. म्हणजेच बचतगटांची वाढत्या संख्येबरोबरच कृषी आधारित उद्योगांची संख्या वाढत आहे.

**जालना जिल्ह्यातील महिला बचत गटांची स्थिती (सन २०१५):**

जालना जिल्ह्यातील महिला बचत गटांची संख्या व त्यांची एकंदरित स्थिती खालील तक्त्याव्दारे दर्शविता येईल.

तक्ता क्र २

**जालना जिल्ह्यातील महिला बचत गटांव्दारे करण्यात येणाऱ्या उद्योगाचा तपशील**

(२०१५)

| अ. क्र. | तालुका | बचत गटांची एकुण संख्या | महिला बचत गट संख्या | कृषी आधारित उद्योग सुरु केलेल्या बचतगटांची संख्या | बचतगटांची वार्षिक उलाढाल (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोकरदन | ७५३ | ६५० | ४२ | ९७.८३ |
| २ | जाफ्राबाद | ५७८ | ४४० | २९ | ८८.३५ |
| ३ | जालना | ६४३ | ५२५ | ३० | ६४.३० |
| ४ | बदनापूर | ४६० | ३६० | ४५ | ८८.१० |
| ५ | अंबड | ६८५ | ५६५ | ४६ | १३६.०० |
| ६ | घनसावंगी | ४७५ | ३३९ | २८ | ८५.६० |
| ७ | परतुर | ५५१ | ४३५ | ३२ | ६५.७० |
| ८ | मंठा | ३९२ | २४५ | ४५ | १०२.७४ |
|  | एकुण | ४५३७ | ३५५९ | २९७ | ७२८.६२ |
|  | सहसंबंध |  | १.०० | ०.९९ | १.०० |

स्त्रोत: जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जालना

जालना जिल्ह्यातील बचत गटांची स्थिती तक्ता २ मध्ये दर्शविली आहे. जालना जिल्ह्यात २०११ मध्ये एकुण ४५३७ बचत गट होते. यापैकी ३५५९ बचतगटे ही महिला बचतगटे आहेत. या महिला बचत गटापैकी २९७ महिला बचतगटांनी कृषी आधारित व्यवसाय सुरु केलेले आहेत. एकुण बचत गटापैकी

सर्वात जास्त बचतगटे ही भोकरदन तालुक्यात (७६३) आढळतात तर सर्वात कमी बचतगटे ही मंठा तालुक्यात (३९२) आढळूत येतात. जिल्ह्यातील एकुण महिला बचतगटापैकी सर्वात कमी बचतगटे ही मंठा तालुक्यात आढळूत येतात ज्यांची संख्या २४५ आहे तर सर्वात जास्त महिला बचत गटांची संख्या ही ५६५ इतकी आहे व ही संख्या मंठा तालुक्यातून दिसून येते. जिल्ह्यातील एकुण महिला बचतगटापैकी २९७ (८.३५%) इतकी बचतगटे ही व्यवसाय करतात. व्यवसाय करणाऱ्या महिला बचतगटांची सर्वाधिक संख्या ही अंबड तालुक्यात आढळते जी ४६ इतकी आहे तर सर्वात कमी संख्या ही घनसावंगी तालुक्यात आढळते जी संख्या २८ इतकी आहे.

जालना जिल्ह्यातील महिला बचतगटाव्दारे करण्यात येणाऱ्या व्यवसायाची आर्थिक उलाढाल ७२८.६२ लाख इतकी दिसून येते. अंबड तालुक्यात सर्वाधिक व्यवसाय करणाऱ्या महिला बचतगटांची संख्या असल्याने सर्वाधिक आर्थिक उलाढालही तेथेच आढळून येते. याउलट सर्वात कमी आर्थिक उलाढाल ही जालना तालुक्यात आढळून येते जी संख्या ६५.७ लाख एवढी आहे. बचतगटातील एकुण बचत गट व महिला बचतगटांची संख्या यातील सहसंबंध (१.००) हे परिपूर्ण सहसंबंध आहेत तर उद्योग सुरु केलेले बचतगट व त्यांची आर्थिक उलाढाल यांच्यातील सहसंबंध सुध्दा पूर्ण सहसंबंध आहेत.

**संदर्भ :**


- घारपुरे, व्ही. टी. : लोकसंख्या भूगोल पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
- ठाकरे, गुलाबराव (२००६): बचतगट- एक वरदान, आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे.
- पवार, वैशाली (२०१२): महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
- Jhingan, K.L. (1976): The Economic of Development and Planning, Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi.
- Kuchal S.C. (1967): The Industrial Economy of India, Chaitanya Publishing House, Allahabad.
- R.P. Mistra (1995): Regional Planning – concepts, Techniques policies an case study, concept publication New Delhi.
- Singh Jasbhir : (1974) An Agriculture Atlas of India. A Geographical Analysis, Vishal Publication, Kurukshetra, India, P-13.